सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालयास वाढीव स्थायी अग्रिम आहरण करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः सनिप्रा-२०१५/प्र.क्र.२०४/१३-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०१ जानेवारी, २०१६.

वाचा :

१) शासन अधिसूचना क्रमांकः सीएसएल-२०१३/प्र.क्र.१२४/१५- स, दिनांक ३०/३/२०१३.
२) शासन निर्णय : सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: सवनि/३११३/प्र.क्र.७२/आस्था-१, दिनांक ३१/१०/२०१३.
३) शासन निर्णय : सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः सनिप्रा-२०१५/प्र.क्र. २४/१३-स, दिनांक ०३/०३/२०१५.
४) शासन निर्णय : वित्त विभाग क्र. मआख-२०११/प्र.क्र. १९/२०११/विनियम, दिनांक : ०८/०५/२०१४.
५) सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे पत्र क्र. रासनिप्रा/निवडणूक/लेखा/स्थायी अग्रिम/५७३४/२०१५ दिनांक ४/७/२०१५.

प्रस्तावना :

राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी वाचा क्र. १ येथील नमूद अधिसूचनेन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाची स्थापना झाल्यानंतर, प्राधिकरणासाठी वाचा क्र. २ येथील शासन निर्णयान्वये ४४ पदांची निर्मिती करण्यात आली. त्याचप्रमाणे वाचा क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांना विभागप्रमुख घोषित करण्यात आले.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ च्या नियम ५६ च्या खंड तीन मध्ये वाचा क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये सुधारणा करुन त्यामध्ये प्रशासनिक विभाग महालेखापालांच्या सल्ल्याशिवाय विभागप्रमुखांच्या कार्यालयांसाठी रुपये ५०००/- पर्यंत तसेच विभागप्रमुख त्यांना दुय्यम असलेल्या कार्यालयांसाठी महालेखापालांच्या सल्ल्याशिवाय रुपये २०००/- पर्यंत स्थायी अग्रिम मंजूर करतील अशी तरतूद करण्यात आली. मात्र महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चे उपविभाग १५ मधील नियम ५६ च्या तरतूदी व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील नियम ५६ मधील तरतूदीनुसार विभागप्रमुख म्हणून घोषित केलेल्या कार्यालयांना महालेखापालांच्या सल्ल्याने रुपये २००००/- पर्यंत स्थायी अग्रिम निश्चित होऊ शकते. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांना विभागप्रमुख म्हणून घोषित केले असल्याने व सन २०१४-२०१५ मध्ये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास कार्यालयीन खर्चासाठी प्राप्त झालेली रु. ४,३५,०००/- इतकी अनुदानाची रक्कम कार्यालयीन बाबींवर खर्च पडली असून, दरमहा सरासरी खर्च रुपये ३६,०००/-पेक्षा जास्त होत असल्याने रु.२०,०००/-पर्यंत स्थायी अग्रिम मंजूर करण्याची विनंती सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांनी त्यांच्या

वाचा क्र. ५ येथील पत्रान्वये शासनास केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने त्यांच्या कार्यालयास रुपये २०,०००/- मर्यादेपर्यतचे स्थायी अग्रिम आहरण करण्यास मंजूर देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चे उपविभाग १५ मधील नियम ५६ च्या तरतुदी व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील नियम ५६ मधील तरतूदीनुसार महालेखापालांच्या सल्ल्याने विभागप्रमुख म्हणून घोषित केलेल्या कार्यालयांना स्थायी अग्रिमाची रक्कम निश्चित करण्याबाबत प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या पूर्ण अधिकारांस अधीन राहून सचिव,राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयास रु.२०,०००/- च्या मर्यादेपर्यंत स्थायी अग्रिम आहरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

स्थायी अग्रिमाची रक्कम खर्चाचा प्रधानशिर्षवार-नि-विभागावार, सारांश व लोक लेखा पुस्तिकेमधील ८६७२ स्थायी रोख अग्रधन (नागरी) (८६७२ ००१ ३) या लेखाशिर्षाखाली खर्ची दर्शविण्यात यावी व लोक लेखा भाग-१ महसूल व जमा यांचे तपशिलवार अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिकेमधील ८६७२ स्थायी रोख शिल्लक अग्रधन (नागरी) अंतर्गत १०१(००) (०१) नागरी (८६७२ ५०१५) या लेखाशिर्षाखाली चलनाद्वारे जमा करण्यात यावेत.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चे उपविभाग १५ मधील नियम ५६ (पाच) नुसार अशा अग्रिमांच्या रकमा सर्वथा आवश्यक असतील त्यापेक्षा अधिक असता कामा नये याबाबतची दक्षता सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५०९/१५/विनियम, दिनांक १५.१०.२०१५ तसेच प्रधान महालेखाकार यांच्या कार्यालयाचा अनौपचारीक संदर्भ क्र. टी.एम./सीएच-५/यु.ओ.आर.-१३८/२०१५-१६/९२७, दिनांक ०२/१२/२०१५ अन्वये देण्यात आलेल्या अभिप्रायांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०११६०५२५४१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Jayaram Choudhary

Digitally signed by Anil Jayaram Choudhary
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation Marketing And Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f26cf80358fa3133e4d85ddac30ae54b06c63743fd5510dc0ebca082b6c483ce, serialNumber=d124ae9bbd15bed87dbd08ef779cf1b85a4020339eb1c2ef0e112fb67063011c, cn=Anil Jayaram Choudhary
Date: 2016.01.01 16:06:23 +05'30'

(अनिल चौधरी)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल,महाराष्ट्र-१, लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता,(मुंबई)

२. महालेखापाल,महाराष्ट्र-२, लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता,(नागपूर)
३. संचालक,लेखा व कोषागारे,मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी,मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे
७. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
८. सचिव,राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे
९. कक्ष अधिकारी, कार्यासन १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१०.निवडनस्ती १३-स.